# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

---

**दिनांक २१.०९.२०२६ सोमवार**

**श्री गणेश विसर्जन संबंधाने सुरक्षा आढावा बाबत :–**

गणेश उत्सव २०२६ दिनांक १४.०९.२०२६ पासुन सुरु असुन, श्री गणेश मुर्तीचे विसर्जन श्रध्दापुर्वक, सुरक्षित व सुविधाजनक पध्दतीने पार पडावे या हेतुने नागपूर महानगरपालिका व नागपुर शहर पोलीस यांचे वतीने दिनांक २०.०९.२०२६ रोजी सुरक्षा आढावा मा. आमदार श्री. विकास ठाकरे, मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर व मा. श्री. डॉ. विपीन इटनकर यांचे प्रमुख उपस्थितीत घेण्यात आला. आढाव्यादरम्यान खाजगी तथा सार्वजनिक मंडळांच्या लहान व मोठ्या श्री गणेश मुर्तीचे विसर्जन करण्यात येणारी ठिकाण जसे, पोलीस लाईन टाकळी तलाव, गोरेवाड तलाव, कोराडी तलाव, कोलार तलाव, कच्छीविसा तलाव इत्यादी ठिकाणी मान्यवरांनी भेटी देऊन पाहणी केली. तसेच, श्री गणेश विसर्जन वेळी भाविक नागरिकांचे सोयीचे व सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजनेबाबत योग्य ते निर्णय घेण्यात आले. त्याचप्रमाणे रस्त्यांवर वाहतुक कोंडी होणार नाही याबाबत संबंधितांना योग्य त्या सुचना देण्यात आल्या.

सुरक्षा आढावावेळी म.न.पा. सत्तापक्ष नेते मा. श्री. बाल्या बोरकर, मा. सहपोलीस आयुक्त श्री. नविनचंद्र रेड्डी, मा. म.न.पा. अतिरिक्त आयुक्त श्री. अंकित गोयल, मा. पोलीस उपायुक्त श्रीमती अन्नपुर्णा सिंग, श्री. रमेश धुमाळ, श्री. आदित्य मिरखेलकर, श्री. संदीप पखाले, मा. सहा.पोलीस आयुक्त श्री. शिवप्रसाद पारवे तसेच, वेगवेगळ्या प्रभागाचे नगरसेवक श्री. अभिजीत झा, श्री. प्रमोदसिंग ठाकूर, मा. मुख्य स्वच्छता अधिकारी श्री. गजेंद्र महल्ले, मा. मुख्य अभियंता श्रीमती लीना उपाध्ये, मा. मुख्य अग्निशमन अधिकारी श्री. राजेंद्र उचके, मा. विभागीय अधिकारी श्री. दिनदयाल टेंभेकर, मा. सहायक आयुक्त श्री. अशोक गराटे, मा. कार्यकारी अभियंता श्री. राजेद दुपारे, विद्युत विभागाचे अधिकारी श्री. राजेंद्र राठोड तसेच, इतर पोलीस अधिकारी व अंमलदार हजर होते.



(कामगिरी)

<u>१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—</u>

दिनांक २०.०९.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये १० केसेसमध्ये १४ ईसमावर कारवाई करून एकुण २८,७९,९००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०२ केसेसमध्ये १९ इसमांवर कारवाई करून एकुण २,५६,६२०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १४७२ केसेस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये १५ केसेस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये १७ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये ४२ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये १३१ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये १४ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४ए मोवाका अन्वये ३३ केसेस, ड्रायव्हींग विदाऊन युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये ०३ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ४४ केसेस, बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ०१ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये ०८ केसेस, विटाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४बी(१) मोवाका अन्वये १५ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे ०१ केस, व इतर कलमांखालील गुन्हे असे एकुण १,८४१ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. २,१६,७००/—रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

**दिनांक २०.०९.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २१.०९.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये १० इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे**.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

<u>२) गुन्हेशाखा भुमाफिया विरोधी पथकाची कामगीरी :— दगडी कोळश्याची चोरटी खरेदी—विक्री करणाऱ्या आरोपींना अटक, एकुण ११,६२५ किलो दगडी कोळसा जप्त.</u>

दिनांक २१.०९.२०२६ रोजी, गुन्हेशाखा भुमाफिया विरोधी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना गुप्त बातमीदारामार्फतीने माहीती मिळाली की, पोलीस ठाणे नवीन कामठी हद्दीत, कामठी रेल्वे क्रॉसिंग ते गादा गावाकडून आवंढी गावाकडे जाणारे रोडवरील गादा शिवारात, रहमत एक्झीन फर्म येथे बेकायदेशीरपणे दगडी कोळश्याची खरेदी विक्री होत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन नमुद ठिकाणी सकाळी ०४.०० वा. चे सुमारास, पंचासमक्ष रेड कारवाई कली असता, फर्मचे आतमध्ये दगडी कोळश्याचे ठिगारे दिसुन आले. तसेच, फर्म चे बाजुला चार इसम हे चार दुचाकी वाहनांसह मिळून आले. त्यांना ताब्यात घेऊन, त्यांची नावे व पत्ता विचारला असता, त्यांनी त्यांची नावे १) आहाद फिरोज अहमद, वय १९ वर्षे, रा. नया गोदाम, ता. कामठी, जि. नागपूर असे असुन, तो फर्ममध्ये कामगार असल्याचे आणि फर्म मालक आरोपी क्र. २) दानिश मोहम्मद अकरम, वय २८ वर्षे, रा. इस्माईलपुरा, नया गोदाम कामठी, नागपूर असल्याचे सांगीतले. तसेच, ईतर ०३ वाहनांवरील ईसमांनी त्यांची नावे आरोपी क्र. ३) चेतन रमेश शेंद्रे, वय २४ वर्षे, रा. साईनगर, गोरेगाव टेकाडी, ता. पारशिवनी, जि. नागपूर ४) कुणाल हरीश राऊत, वय २७ वर्ष, रा. खदान क्र. ६, शिवमंदीर जवळ, कन्हान, ता. पारशिवनी, जि. नागपुर ५) अतुलसिंग अभिमन्युसिंग, वय १८ वर्ष, रा. खदान क्र. ६, शिवमंदीर जवळ, कन्हान, नागपूर असे सांगीतले. त्यांना सखोल विचारपुस केली असता, आरोपी क्र. ३, ४ व ५ हे संगणमताने कन्हान खदान येथुन दगडी कोळसा चोरी करुन, आरोपी क्र. २ चे फर्ममध्ये स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता विक्रीकरीता

आणल्याचे त्यांनी कबुल केले. आरोपींचे ताब्यातुन रोख १०,५००/—रू. व दगडी कोळसा एकुण वजनी ११,६२५ किलो, वजन काटा, पल्सर गाडी क्र. एमएच ४० झेड ७९५१, स्प्लेंडर गाडी क्र. एमएच ४० डब्ल्यु २९२१, हिरो एचएफ डिलक्स गाडी क्र. एमएच ४० बीआर ५४३५ व हिरो एचएफ डिलक्स गाडी क्र. एमएच ४० बीडब्ल्यु ५४३५, ०२ मोबाईल असा एकुण २,३०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता संगनमताने दगडी कोळश्याची चोरी करुन, चोरटया मार्गाने खरेदीविक्री करीत असल्याचे निष्पन्न झाले व चोरटी खरेदी—विक्री करतांना समक्ष मिळून आल्याने, त्यांचेविरुध्द पोलीस ठाणे नवीन कामठी येथे कलम ३०३(२),३१७(२) भान्यास अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींना अटक करुन, मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव नवीन कामठी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, मपोनि. श्रीमती संजिवनी थोरात, पोहवा. भागवत वानखेडे, महेश सेलोकार, पोअं. अमर गणवीर व ऋषिकेश जुमडे यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे एमआयडीसी :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी धनंजय परसराम गायकवाड वय ५२ वर्ष, रा. म्हॉडा कॉलनी क्वॉर्टर क्र. २०३/११५, दवलामेटी, आठवा मैल, वाडी, नागपुर हे शालिनीताई मेघे हॉस्पिटल येथे सुरक्षा रक्षक असुन, ते आपले कर्तव्यावर हजर असतांना, दिनांक २०.०९.२०२६ चे १४.०० वा चे सुमारास, इसम नामे शामकृष्णन पीपीके, वय २६ वर्षे आणि अमन केपी, वय २३ वर्षे, दोन्ही रा. थेरीयारी, मनियार, जि. कन्नुर, राज्य केरळ, हल्ली मुक्काम— गणेश दराके यांचे घरी किरायाने, प्लॉट क्र. ६०, मातोश्री नगर, वानाडोंगरी, नागपूर हे पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत शालिनीताई मेघे हॉस्पिटल, जुनी ओपीडी समोरील रोडने पायदळ जात असता, ट्रक क्र. एमएच ४० सीटी ३१६२ चे आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन पायदळ जाणारे दोन्ही ईसमांना धडक देवुन, घटनास्थळावरुन पळुन जात असता, तेथुनच मोपेड क्र. एमएच ४० एएच ४१५६ ने जाणाऱ्या महिला नामे श्रध्दा विक्की वासेकर वय २९ वर्षे रा. प्लॉट क्र. ७२, मिसाळ ले—आऊट, मोठा इंदोरा, जरीपटका, नागपुर यांचे मोपेडला सुध्दा धडक देऊन, दोन्ही पायदळ व मोपेडस्वार महिला यांना गंभीर जखमी करुन, जखमींना कोणतीही मदत न करता पळून जाताना दिसुन आला. फिर्यादी व लोकांनी तिन्हीही जखमी यांना उपचाराकरीता शालिनीताई मेघे हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी शामकृष्णन पीपीके यांना तपासुन मृत घोषीत केले. अमन केपी व श्रध्दा यांचा उंपचार सुरु आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे पोउपनि. संजय अवचिते ९८२३६६३४५९ यांनी ट्रक चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१),२८१,१२५(अ),१२५(ब) भा.न्या.सं., सहकलम १८४,१७७,१३४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपी ट्रक चालकाचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे नंदनवन :— शस्त्र बाळगुन धुमाकुळ घालणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २१.०९.२०२६ चे ००.४५ वा. चे सुमारास, नंदनवन पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत रात्रगस्त करीत असता, त्यांना श्रीकृष्ण नगर चौक येथे एक इसम शिवीगाळी करुन धूमाकूळ घालतांना दिसुन आला. पंचासमक्ष त्यास ताब्यात घेऊन, त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव राहुल उमाकांत

इटनकर, वय ३१ वर्षे, रा. दर्शन कॉलनी, सरकारी दवाखान्याजवळ, नंदनवन, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आत कंबरेत लपविलेला एक लोखंडी चाकु किंमती ५००/—रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे नंदनवन येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा. ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**

**( नितीन चुलपार )**

**सहा.पोलीस निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**